**वि.दि.दा. क्र. १/२०२२**
जिवराज वि. मनोज
**निशाणी क्र. ५८**

//०५//

**<u>साक्षीदारचा उलटतपास शपथेवर वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. जगताप यांचेमार्फत</u>**

**<u>सुरु:-</u>**

१. हे म्हणणे खरे आहे की, वादी हे लव्हे, ता. माढा या गावचे रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांना लिहिता व वाचता येत नाही ते अंगठा करतात. हे म्हणणे खरे आहे की, मी, प्रतिवादी, बळीराम डांगे हे लोहारा येथील गावाचे आहोत. हे म्हणणे खरे आहे की, मी माझी जमीन मौजे लोहारा येथील गट क्र. १४६ पैकी २०आर ची इसारपावती करुन दिली होती व त्यानंतर त्याचे खरेदीखत करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, इसारपावती ही नोंदणीकृत केलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी जिवराज यांच्या कब्जेवहिवाटीत हरकत अडथळा करु नये म्हणुन जिवराज याने माझ्याविरुध्द दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दाव्यामध्ये माझ्याविरुध्द मनाईचा आदेश झालेला आहे. हे मला माहित नाही की, मी मनाई विरुध्द केलेले अपील केले होते परंतु ते फेटाळले आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझा व जिवराजचा वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मनोज माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मनोज यांना मदत करण्यासाठी आज साक्ष देण्याकरीता आलो आहे.

२. जिवराज सावकारकीचा व्यवसाय करत असल्याची तक्रार मनोज याने केली होती किंवा कसे याची मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, इसारपावतीवर मी साक्षीदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दोघामध्ये काय व्यवहार झाला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर व दोन ट्रेलन नोंदणीकृत दस्ताद्वारे लिहुन घेतल्याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे मला मान्य आहे की, मनोज व जिवराज यांच्यामध्ये व्यवहार झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मनोज याने जिवराज यांना जमीन विक्री करण्याचे मान्य केले होते. साक्षीदार सांगतात की, सावकारकीत दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, जमीन सावकारकीत आहेत व परत घ्यायची आहे असा लेखी करार झाला नाही. साक्षीदार सांगतात की, नोटरी झाली होती. सदरची नोटरी

कधी झाली त्याची तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटरीमध्ये मी साक्षीदार नव्हतो.

३. हे म्हणणे खरे नाही की, जिवराज याने मनोज यांना ६,५०,०००/- रुपये दिले होते. साक्षीदार सांगतात की, ३,००,०००/- रुपये दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मनोज यांनी जिवराज यांना कोणतीही रक्कम परत दिली नाही. मनोज याने रक्कम दिल्यानंतर पावती लिहुन घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, बळीराम डांगे व विजय डांगे या दोघांचे वेगवेगळे व्यवहार आहेत. हे मला माहित नाही की, सुब्राव पाटील वि. अंगद पाटील यामध्ये जिल्हा निबंधक यांनी दिलेला निकाल आयुक्त यांनी रद्द केला किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सदर निकालामध्ये मनोज यांच्या जमिनीचा काही संबंध नाही. सदर तक्रारीमध्ये मनोज तक्रारदार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत सदरच्या तक्रारीमध्ये नव्हती. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था औरंगाबाद (छ. संभाजीनगर) येथील प्रकरणामध्ये मी पक्षकार होतो. हे मला माहित नाही की, तेथील प्रकरणाचा निकाल मे २०२५ मध्ये लागला व त्याची प्रत मला पोस्टाने आली किंवा कसे.

४. हे म्हणणे खरे आहे की, जिवराज यांचे वय ७० ते ७५ वर्षे आहे. जिवराज यांनी मला व मनोजला धमकी दिल्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला आम्ही तक्रार दाखल केली नाही. जिवराज प्रतिवादी यांच्या घरी येवून धमकी देत होते याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाचे शपथपत्र हे मनोज यांच्या म्हणण्यावरुन तयार केले. हे म्हणणे खरे आहे की, मी शपथपत्र वाचुन पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, शपथपत्रामध्ये काय लिहिले आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, जिवराज यांनी मनोज यांना ६,५०,०००/- रुपये दिले नाहीत, व त्यापैकी रुपये २,५०,०००/- परत दिले हे मी खोटे सांगत आहे. सन २०१७ साली ट्रॅक्टर व्यवसाय सुरु केल्यावर मी व मनोज यांनी जिवराज यांच्याकडून ४ टक्के व्याजाने पैसे घेतल्याचा पुरावा मी दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जिवराज व माझा वाद असल्यामुळे मी मनोज यांना मदत करण्यासाठी साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व जिवराज यांच्यामध्ये

**वि.दि.दा. क्र. १/२०२२**
जिवराज वि. मनोज
**निशाणी क्र. ५८**



झालेल्या व्यवहारामध्ये असे नमुद नाही की, खरेदीखत परत द्यायचा उल्लेख केलेला नाही. साक्षीदार सांगतात की, तोंडी सांगितले होते. माझ्यामध्ये व जिवराजमध्ये खरेदीखत रद्द करण्याचा लेखी करार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मनोज यांच्या सांगण्यावरुन खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2025.12.06 16:45:35 +0530

दिनांकः ०६.१२.२०२५

**(आर. टी. इंगळे)**
सह दिवाणी न्यायालय व स्तर, परंडा.